**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – महेश सिताराम आहेर

माझे वय ४५ वर्षे व्यवसाय पोलीस हेड कॉन्स्टेबल.

राहणार आश्वी पोलीस ठाणे, ता. संगमनेर, जि.अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत.**

१. दिनांक २६.०५.२०२१ रोजी मी अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी तत्कालीन ठाणे अंमलदार सहा.पोलीस फौजदार सय्यद यांनी वरिष्ठांच्या लेखी आदेशाने गु.र.नं.१७१/२०२१ चा तपास माझ्याकडे वर्ग केला. आता मला तो आदेश दाखविला. तो आदेश तोच आहे. त्या आदेशावर तत्कालीन ठाणे अंमलदार सय्यद यांची सही आहे. मी त्यांचे सोबत काम केल्यामुळे त्यांची सही मी ओळखतो. त्या आदेशातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–४८** देण्यात आली. त्या आदेशासोबत मला एफ.आय.आर.ची प्रत, दैनिक अहवाल, फिर्याद ही कागदपत्रे प्राप्त झाली. मी त्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. दिनांक २६.०५.२०२१ रोजी मी आरोपी क्र.१ ला सोबत घेवून घटनास्थळी गेलो. मी तेथे दोन पंचांना बोलावून घेतले. आरोपी क्र.१ ने जेथून वाळू भरली होती, ते सोनेवाडी येथील यमुना नदीचे पात्र दाखविले. त्या ठिकाणी वाळूचे ढीग व काही ठिकाणी खड्डे पडले असल्याचे दिसून आले. त्यानुसार मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. आता मला तो पंचनामा दाखविला. तो पंचनामा तोच आहे. त्या पंचनाम्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. त्या सह्या मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्याला **निशाणी पी–४९** देण्यात आली.

३. मी आरोपी क्र.१ ला पुन्हा अकोले पोलीस ठाणे येथे घेवून आलो. तेथे मी आरोपी क्र.१ चा जबाब नोंदविला. आरोपी क्र.१ ला अटक करून न्यायालयासमोर हजर केले.

४. दिनांक २७.०५.२०२१ रोजी मी दोन पंचांसमक्ष गुन्हयातील टाटा कंपनीचा ४०७ मॉडेलचा चॉकलेटी रंगाचा टेम्पो व त्या टेम्पोला जोडलेला पिवळ्या रंगाचा हौदा नोंदणी क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ व त्यातील सुमारे एक ब्रास वाळू यांचा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला तो पंचनामा दाखविला. तो पंचनामा तोच आहे. त्या पंचनाम्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. त्या सह्या मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्याला **निशाणी पी–५०** देण्यात आली.

५. मी आरोपी क्र.१ कडे चौकशी केली असता तो टेम्पो शंकर खंडू हासे, रा.म्हाळादेवी यांचा असल्याचे सांगितले. आरोपी क्र.१ ने मला सांगितले की, शंकर खंडू हासे यांनी त्यांना वाळू भरून आणण्यास सांगितले होते व ती वाळू कोठे खाली करायची आहे, याबाबत ते त्यांना सांगणार आहेत. दिनांक २८.०५.२०२१ रोजी मी टेम्पो मालक शंकर खंडू हासे यांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले. मी त्यांचेकडून त्या टेम्पोचे आर.सी.बुक जप्त केले.

६. दिनांक ३१.०५.२०२१ रोजी मी मा.तहसिलदार, अकोले यांना या प्रकरणाबाबत अहवाल सादर केला.

७. मी संबंधित साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली.

८. तपासाअंती आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करून सोनेवाडी, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील यमुना नदीच्या पात्रातून वाळूची चोरी करून ती वाळू टेम्पो क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ मधून अकोले शहराच्या हद्दीतून

वाहतूक करीत असताना मिळून आल्याने मी त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र.१ व २ हे न्यायालयासमोर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**(मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास मध्यान्हाच्या वेळेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.15 18:33:32 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**दिनांक – १५.०९.२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**<u>मध्यान्हानंतर उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एन.बी.वाकचौरे यांचे मार्फत</u>–**

**९.** दिनांक २६.०५.२०२१ रोजी पहाटे ०५.४१ वाजता मला या गुन्हयाचा तपास करण्याबाबतचा आदेश प्राप्त झाला. मी पंचांना घटनास्थळी बोलावले. मी पंचांना फोन करून बोलावले होते. मी पोलीस ठाण्यातून निघताना पंचांना फोन केला होता. मी पंचनाम्याला जाण्यापूर्वी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या जिल्हयामध्ये तपास करण्यासाठी जावयाचे असल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक यांची परवानगी घ्यावी लागते.

**१०.** प्रश्न – तुम्ही याकामी जिल्हा पोलीस अधीक्षक यांची परवानगी दाखल केली आहे का ?

उत्तर – मी सुरुवातीला अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घटनास्थळी गेलो होतो. परंतु, आरोपी क्र.१ ने घटनास्थळ हे अकोले तालुक्याला लागून असलेल्या सिन्नर तालुक्यातील ठिकाण असल्याचे सांगितल्याने आम्ही थेट

त्या ठिकाणी गेलो.

**११.** पहिले ठिकाण हे देवठाण गावच्या हद्दीमध्ये होते. माझ्याकडे तपास वर्ग झाल्यानंतर पाच मिनिटांनी मी घटनास्थळी जाण्यासाठी निघालो. हे म्हणणे खरे आहे की, देवठाण येथे जाण्यासाठी १५ ते २० मिनिटे लागतात. मी खाजगी वाहनाने गेलो होतो. ते खाजगी वाहन माझ्या स्वत:च्या मालकीचे होते. देवठाण या गावापासून यमुना नदीचे ते पात्र वाहनाने सुमारे दहा मिनिटांच्या अंतरावर होते. मी तेथे गेल्यानंतर ते गाव कोणते याबाबत चौकशी केली होती. ते गाव सोनेवाडी होते. मी सोनेवाडी गाव ज्या संबंधित पोलीस ठाण्यामध्ये येते, त्या पोलीस ठाण्याला पंचनामा करणार असल्याबाबत कळविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये तपासासाठी गेल्यानंतर त्या पोलीस ठाण्याला त्याबाबत लेखी नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, मी या प्रकरणी तशी नोंद केलेली नाही. मी सोनेवाडी येथे असलेल्या घटनास्थळी सकाळी ०६.१५ वाजताच्या दरम्यान पोहोचलो. पंच हे देवठाण येथे आले होते. ते खाजगी वाहन म्हणजे माझी अल्टो कार होती. त्यावेळी त्या कारमध्ये मी, आरोपी क्र.१ व पोलीस शिपाई असे आम्ही तिघेजण होतो. त्या पंचनाम्यासाठी साधारण पाऊण तास लागला. मी सकाळी ०७.४५ वाजताच्या दरम्यान अकोले पोलीस ठाणे येथे परत आलो.

**१२.** आरोपी क्र.१ च्या अटकेचा पंचनामा मी स्वत: भरला आहे. मी आरोपी क्र.१ चा अटक पंचनामा अकोले पोलीस ठाणे येथे भरला आहे. आता मला आरोपी क्र.१ चा अटक पंचनामा दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, अटक पंचनाम्यामध्ये आरोपी क्र.१ ला दिनांक २६.०५.२०२१ रोजी सकाळी ०६.३४ वाजता अटक केल्याची नोंद आहे. (आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एन.बी.वाकचौरे यांनी साक्षीदाराला आरोपी क्र.१ चा अटक पंचनामा उलटतपासादरम्यान दाखविल्याने त्या अटक

पंचनाम्याला **निशाणी सी–५१** देण्यात आली.)

**१३.** दिनांक २६.०५.२०२१ रोजी सकाळी ०७.४५ वाजताचे सुमारास मी घटनास्थळ पंचनामा करून अकोले पोलीस ठाणे येथे आल्यानंतर ते दुस–या दिवशी दिनांक २७.०५.२०२१ रोजी जप्ती पंचनामा करेपावेतो मी आरोपी क्र.१ कडे चौकशी करून आरोपी क्र.२ याचे नाव निष्पन्न केले व त्याला अटक केली आणि साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. मी याकामी फक्त एका साक्षीदाराचे तपास टिपण नोंदविले आहे. ते तपास टिपण मी दिनांक २६.०५.२०२१ रोजी सकाळी ११.१५ ते ११.३० वाजताचे दरम्यान नोंदविले आहे.

**१४.** दिनांक २६.०५.२०२१ ते दिनांक २७.०५.२०२१ रोजी जप्ती पंचनामा करेपावेतो कथित जप्त टेम्पो अकोले पोलीस ठाणेमध्ये कोणाच्या ताब्यात होता, याबाबतची कागदपत्रे मी याकामी दाखल केलेली नाही. दिनांक २५.०५.२०२१ चे रात्री पो.कॉ.भोसले व पो.ना.चालक पटेकर हे गस्त घालण्यासाठी गेले होते, हे दाखविण्यासाठी संबंधित स्टेशन डायरीचा उतारा अगर सरकारी वाहनाचे लॉग बुकचा उतारा मी याकामी दाखल केलेले नाहीत. कथित जप्त टेम्पो अकोले पोलीस ठाणे येथे आणून जमा केल्याबाबत स्टेशन डायरीचा उतारा मी याकामी दाखल केलेला नाही.

**१५.** दिनांक २७.०५.२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता मी जप्ती पंचनाम्यासाठी पंच साक्षीदारांना फोन करून बोलावले होते. ते पंच सकाळी १०.१५ वाजताचे दरम्यान पोलीस ठाण्यात आले. त्याबाबतची नोंद मी स्टेशन डायरीला केलेली नाही. जप्ती पंचनामा केल्याबाबतची नोंद मी स्टेशन डायरीला केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती पंचनामा करतेवेळी आरोपी क्र.१ व २ हे त्या ठिकाणी हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटा व चुकीचा जप्ती पंचनामा

तयार केला आहे.

**१६.** दिनांक २६.०५.२०२१ रोजी पहाटे ०५.३० वाजता मी अकोले पोलीस ठाणे येथे आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.०५.२०२१ रोजी टेम्पा क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ हा अकोले पोलीस ठाणे येथे जमा नसल्याने मी त्या दिवशी जप्ती पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०५.२०२१ रोजी मी बेकायदेशीररित्या तो टेम्पो आणून त्या दिवशी जप्ती पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा हे मी माझ्या कार्यालयात बसून तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा मिळून आलेला नसताना मी त्यांचेविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.15 18:33:42 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – १५.०९.२०२५**